TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरागांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्र. २८१९ २८ २८/ २८१९ ३० २८ फॅक्स क्र. २८१९७६३६
ई मेल : 1) rchmbmc@rediffmail.com, 2) rchmbmc@gmail.com

वैद्यकीय आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/वैद्यकीय /१२२५/२०२०-२१ दि. १२/०८/२०२०

प्रति,
**सिस्टीम मॅनेजर**
**संगणक विभाग,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- कोविड-१९ करीता आवश्यक पदांची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कोरोना विषाणू (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेत सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiologist), वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Sr. Lab Technician) व कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Jr. Lab Technician) या पदांसाठी करार पध्दतीने ठोक मानधन तत्वावर आवश्यकतेनुसार नेमणूक करण्यासंबंधी जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तरी सदरची जाहिरात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावी.

सोबत जाहिरातीचा नमुना जोडला आहे.

(महेश वरुडकर)
**अति.आयुक्त**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे :- 401 101

जा.क्र.मनपा/वैद्यकीय/१२९५/२०२०-२१

दि.१२/०८/२०२०

## // जाहिरात //

**विषय :- कोरोना विषाणू (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत खालील पदांची एकत्रित ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने आवश्यकतेनुसार नेमणूक करणेबाबत.**

कोरोना विषाणू (कोविड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात काम करण्यासाठी खालील नमुद पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज थेट मुलाखतीद्वारे (Walk In Interview) इच्छुक व पात्र उमेदवारांना अर्जासाठी विनंती करत आहेत. खालील नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण करणाऱ्या तसेच इतर अटींची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी, विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या सांक्षांकित प्रतींसह दि.१४/०८/२०२० रोजी सकाळी. १२.०० ते दुपारी २.०० वा. या कालावधीत वैद्यकीय आरोग्य विभाग, पहिला मजला, मिरा-भाईंदर महानगरपालिका, (स्व.इंदिरा गांधी भवन), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

**उपलब्ध पदसंख्या**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता व अनुभव | मासिक ठोक एकत्रित मानधन | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ (Microbiologist) | एम.डी.मायक्रोबायोलॉजी (MD Microbiology) Molecular lab चा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक | पूर्णवेळ (Full Timer) (८ तासांकरीता) —रु.१,५०,०००/- अर्धवेळ (Part Timer) (४ तासांकरीता) — ७५,०००/- | २ |
| ३ | वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Sr. Lab Technician) | Ph.D Microbiology /Ph.D Biotechnology व Rt PCR लॅबचा किमान २ वर्षाचा कोणत्याही संस्थेचा अनुभव आवश्यक | रु. ३५,०००/- | २ |
| ३ | कनिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ (Jr.Lab Technician) | बी.एससी / एम.एससी मायक्रो (B.Sc./ M.Sc. Micro)/ बी.एससी / एम.एससी बायोटेक्नोलॉजी (B.Sc./ M.Sc. Biotechnology) | रु.३०,०००/- | ७ |

**अटी व शर्ती :-**

१) उमेदवाराची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी प्रथमत: ३ महिन्यांकरीता नेमणूक देण्यात येणार असून त्यांची नेमणूक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच (३ ते ६ महिने) राहणार असून सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी. नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमीपत्र/ बंधपत्र घेण्यांत येईल.

२) नियुक्तीच्या कालावधीत ठोक मानधनावर सदर काम पूर्ण करण्यास जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल व तसे हमीपत्र/बंधपत्र घेण्यात येईल.

३) ठोक मानधनावर नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास महानगरपालिकेच्या /शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत /सामावून घेण्याबाबतचा अधिकार हक्क नसेल.

४) इच्छुक व पात्र उमेदवारांनी जाहिरातीमधील नमुद केलेल्या शैक्षणिक पात्रता/ अर्हता तसेच अनुभव प्रमाणपत्र मुळ प्रती व दोन छायांकित प्रतीचे संचासह उपस्थित रहावे.

**निवड प्रक्रिया :-**

प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

**संपर्क अधिकारी :-**

१) डॉ. अंजली पाटील, (भ्र.क्र.८४२२८११२३५)
वैद्यकीय अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

(महेश वरुडकर)
अति.आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

Scanned with CamScanner